www.janatabankpune.com

# गरुड झेप



ऑक्टोबर, २०२० – अंक २ (जनता सहकारी बँक लि., पुणेद्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)

## अध्यक्षांच्या लेखणीतून

**सस्नेह नमस्कार,**

या आर्थिक वर्षाची (सन २०२०-२०२१) सुरुवातच अभूतपूर्व अशा टाळेबंदीपासून झाली. आजदेखील संपूर्ण जगभर कोरोना नावाच्या विषाणूचे थैमान चालू आहे. 'अभूतपूर्व' हा शब्द आपण एरवी खूपच सैलपणे वापरतो. पण कोरोनामुळे उद्भवलेली परिस्थिती मात्र सर्वार्थाने अभूतपूर्व आहे. याचा प्रत्यक्ष अनुभव आपण प्रत्येकाने गेल्या सहा महिन्यांत घेतला आहे. जगातील सातही खंडांतील दोनशे देश आणि सातशे कोटींहून अधिक जनता हादरून जाण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. जणू काळ थांबला आहे किंवा त्याने काही काळासाठी पॉज तरी नक्कीच घेतला आहे!



अशा या परिस्थितीत देखील आपण न डगमगता कोरोना योद्धे बनून बँकेच्या सभासद, खातेदार, ठेवीदारांना जी बँकिंग सेवा देत आहात, याबद्दल आपले कौतुक करावे इतके थोडे आहे. आज आपण जे झोकून देऊन काम करत आहात, याबद्दल आपले अभिनंदन!

या आर्थिक वर्षातील पहिले सहा महिने (एप्रिल ते सप्टेंबर) टाळेबंदीमध्ये सरले आहेत याचा अर्थ असा की, या आर्थिक वर्षातील फक्त सहाच महिने आता आपल्या हातात शिल्लक आहेत. या आगामी सहा महिन्यांत आपल्या बँकेला आर्थिकदृष्ट्या आणखी सक्षम करण्याचे मोठे आव्हान पेलायचे आहे. सगळा देशच नाही, तर सगळे जग आर्थिक संकटात सापडले आहे. आपण या परिस्थितीत एकत्र येऊन धीराने आणि नेटाने काम केले, तर आपल्या बँकेचे चित्र नक्कीच बदलू शकेल याची मला खात्री आहे. यापूर्वी देखील अशा स्वरूपाची अनेक संकटे आपण परतवून लावली आहेत. संकटसमयी धीराने काम करण्याचा अनुभव आपल्यापाशी आहे. येत्या सहा महिन्यांत हा अनुभव पणाला लावण्याची वेळ आली आहे.




ठेवी, कर्ज वितरण, वसुली, व्यवसाय टिकवणे आणि नव्याने वाढवणे, थकबाकी (एनपीए) वर नियंत्रण ठेवणे, हे काम आपण सतत करतच असतो; मात्र टाळेबंदीनंतर बदललेल्या परिस्थितीत हे काम पूर्वीपेक्षा जास्त आव्हानात्मक होणार आहे, याची आपल्या सगळ्यांना नक्कीच कल्पना आहे.

टाळेबंदीत देखील ग्राहकांना आधुनिक अशा टेक्नोबेस सेवा आपण अहोरात्र उपलब्ध करून दिल्या आहेत. याच सेवा-सुविधांवर आपल्याला भर द्यावा लागणार आहे. सर्वसाधारणपणे असे लक्षात आले आहे की, ग्राहक जर बँकेच्या शाखेत येऊन व्यवहार करत असेल तर त्यासाठी आपल्याला जो खर्च करावा लागतो त्यापेक्षा कितीतरी पट कमी खर्च त्याने नेटबँकिंग किंवा टेक्नोबेस सेवांचा वापर केला तर येतो. त्यामुळे ग्राहकांनी टेक्नोबेस सेवांचा वापर जास्तीतजास्त केला, तर ते बँक व ग्राहक दोघांच्या फायद्याचे आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

सध्याच्या अभूतपूर्व परिस्थितीमधून सहीसलामत बाहेर येण्यासाठी काही कल्पक योजनांचा वापर प्रत्येकाला आपापल्या पातळीवर करावा लागणार आहे. यामुळे वेळ व खर्चावर नियंत्रण ठेवता येईल आणि कामेदेखील वेगाने होतील. अशा योजना आपल्या वरिष्ठांना जरूर कळवाव्यात.

कोरोना या डोळ्याला न दिसणाऱ्या विषाणूने आपल्या सगळ्यांचे डोळे उघडले आहेत. त्यामुळे कोरोनानंतरचे जग हे पूर्णपणे वेगळे असणार आहे. या बदललेल्या परिस्थितीशी मुकाबला करताना आपल्या सगळ्यांनाच जमिनीवर घट्ट पाय रोऊन उभे राहावे लागणार आहे. यासाठी प्रत्येकाला आपल्या स्किल व क्षमता वाढवाव्या लागणार आहेत, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी लागणार आहे; हे आपल्याला नक्कीच लक्षात आले असेल.

बँकेने आगामी सहा महिन्यांसाठी जे उद्दिष्ट ठरवून दिले आहे, ते डोळ्यांसमोर ठेवून झोकून देऊन नेटाने काम करायचे आहे. सर्वांनी आपल्याला नेमून दिलेले काम अचूक केले, तर मार्च २०२१ अखेर आपल्या बँकेची आर्थिक परिस्थिती आणखी भक्कम होईल.

दररोज परिस्थिती झपाट्याने बदलत असल्याने टाळेबंदी अजून किती दिवस चालू राहील, याचा अंदाज व्यक्त करणे सध्या शक्य नाही; मात्र नेमून दिलेले काम अचूक करणे आपल्याला सहज शक्य आहे. ते आपण सगळे जण नक्कीच कराल असा मला विश्वास वाटतो.

या जागतिक संकटाशी दोन हात करण्यासाठी प्रथम आपण स्वत:ला सुरक्षित ठेवा. या आव्हानात्मक परिस्थितीत आपण सगळे मिळून आपल्या बँकेच्या यशस्वी वाटचालीत सहभागी होऊ या. यासाठी जनता बँकेच्या सर्व योद्ध्यांना माझ्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

आपला विश्वासू,
**माधव रामकृष्ण माटे**
अध्यक्ष

***

# अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

## भाऊ कार्ले यांना अण्णा भाऊ साठे 'कलाभूषण' पुरस्कार जाहीर



शाहीर अण्णा भाऊ साठे बहुउद्देशीय संस्था सांगली यांचेतर्फे बँकेच्या चिपळूण शाखेचे सेवक ज्येष्ठ रंगकर्मी श्री. भाऊ कार्ले यांना राज्यस्तरीय सांस्कृतिक क्षेत्रामधील कार्याबद्दल 'कलाभूषण' पुरस्कार जाहीर झाला आहे, असे संस्थेचे अध्यक्ष श्री. संतोष नेताजी कांबळे, सांगली यांनी जाहीर केले. चाळीस वर्षांतील हौशी रंगभूमीवरील सेवाकार्याचा आढावा घेऊन त्यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. भाऊ कार्ले १९८० पासून हौशी रंगभूमीवर कार्यरत असून त्यांनी सुरुवातीला प्रशांत पटवर्धन, तात्या आवले, संज्या कदम, मना शिंदे आणि सुमारे चाळीस हौशी कलाकारांना घेऊन 'कनक' ग्रुप स्थापन केला. नंतर संघर्ष क्रीडा मंडळाचे भाऊ काटदरे, नयन साडवलीकर यांच्या सहकार्याने सातत्याने १५ वर्षे कनक संघर्ष सांस्कृतिक नाट्य अभिनय, नृत्य, गायन स्पर्धांचे आयोजन केले. दै. सागरतर्फे ५ वर्षे राज्य नाट्य स्पर्धेचे समीक्षण केले तसेच साखरपासारख्या ग्रामीण भागात १९९० पासून श्री दत्तसेवा तरुण मंडळाच्या सहकार्याने गेली तीस वर्षे विविध कला-क्रीडा स्पर्धांचे ते आयोजन करत आहेत. नुकतेच त्यांनी कनकतर्फे राज्यस्तरीय ऑनलाइन अभिनय स्पर्धा व श्री गणपती अथर्वशीर्ष पठण स्पर्धांचे आयोजन केले. त्यांना स्वत:ला विविध, राज्यस्तरीय एकांकिका अभिनय, नाट्यलेखन, दिग्दर्शन स्पर्धांमध्ये सुमारे २७५ वैयक्तिक पारितोषिके प्राप्त आहेत. नुकताच त्यांना मनुष्यबळ लोकसेवा अकादमीचा 'जीवन गौरव' पुरस्कारदेखील मिळाला आहे. या त्यांच्या उज्ज्वल यशाबद्दल जनता बँक पुणे, चिपळूणचे मॅनेजर श्री. संदीप देशपांडे, सौ. प्राजक्ता पळशीकर, श्रीरंग चितळे, मॉन्टी मोने व सेवकांनी खास अभिनंदन केले.



## कमलेश धूत

औरंगाबाद शाखेतील जुने व ज्येष्ठ खातेदार तसेच Lamifab Pvt Ltd Co. चे संचालक श्री. कमलेश धूत यांची २०२०-२१ या वर्षासाठी चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर (सीएमआयए) च्या अध्यक्षपदी दि. ३/७/२०२० रोजीच्या ऑनलाइन बैठकीमध्ये नियुक्ती झाली. त्यांना शाखा व्यवस्थापक श्री. मनोजकुमार व्यास यांनी प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या.

## वैभवी चांदेरकरचे लॉकडाउन काळातील विविध उपक्रम



जनता सह. बँक पुणेच्या तळेगाव स्टेशन शाखेतील क. अधिकारी श्री. नारायण चांदेरकर ह्यांची कन्या कु. वैभवी नारायण चांदेरकर ही बी.ए. द्वितीय वर्षात शिकत आहे. Foreign language - German (appearing for-2) तसेच शास्त्रीय संगीत - गांधर्व महाविद्यालयाची मध्यमा प्रथमची ती परीक्षा देणार आहे. वैभवी ही के. जे. सोमय्या कला आणि वाणिज्य महाविद्यालयात शिकत असून, या लॉकडाउनच्या काळात महाविद्यालय बंद असल्याने अनेक 'ऑनलाइन' उपक्रमात सहभागी झाली आहे. लॉकडाउनमुळे सर्व शाळा आणि महाविद्यालये बंद असली तरी सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊन ज्ञानप्राप्तीच्या मार्गावर वाटचाल करावी यासाठी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या 'ऑनलाइन पढो, स्वयं बढो!' या जिंगलमालिकेत सहभागी. मे महिन्यात मुलुंड वाणिज्य महाविद्यालयाने आयोजित केलेल्या 'काव्यमंजिरी' या ऑनलाइन काव्यवाचन स्पर्धेत ललिता रामचंद्र यांची 'जपू या जपू या नाती' या कविता सादरीकरणामध्ये द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. स्व. मदनगोपाल मुंदडा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, अमरावतीतर्फे संस्कृत विभागद्वारा कालिदास दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय संस्कृत श्राव्यस्पर्धेत 'मालविकाग्निमित्रम' या नाटकाचा संस्कृतमधून परिचय करून दिला. त्यामध्ये उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

## अभिनंदन!!! बँकिंग परीक्षेतील यशाचे मानकरी

| नाव | परीक्षेचा प्रकार | शाखा /विभाग | हुद्दा | वर्ष |
|---|---|---|---|---|
| श्री. निलेश माधव देशपांडे | एएमएल | कोल्हापूर | सहा. महाव्यवस्थापक | जुलै २०२० |
| श्री. निलेश माधव देशपांडे | कस्टमर सर्व्हिसेस अँड बँकिंग कोड स्टँडर्डस | कोल्हापूर | सहा. महाव्यवस्थापक | सप्टेंबर २०२० |
| कु. मेघना गोविंद देशपांडे | एनआयएसएम | कर्वे रोड | लेखनिक | फेब्रुवारी २०२० |
| सौ. अनुराधा अक्षय नेरकर | एनआयएसएम | कर्वे रोड | लेखनिक | फेब्रुवारी २०२० |
| श्री. मनीष संजय भोमे | एसपी कम्पोझिट्स | मोशी | लेखनिक | मार्च २०२० |

# अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

भारत सरकार ग्राहक संरक्षण परिषद समिती, पुणे

## युवक जिल्हाध्यक्षपदी किरण घोरतळे



भारत सरकार ग्राहक संरक्षण परिषद समिती, पुणे युवक जिल्हाध्यक्षपदी किरण काकासाहेब घोरतळे यांची निवड करण्यात आली आहे. निवडीचे पत्र भारत सरकार ग्राहक संरक्षक परिषद समिती प्रदेश उपाध्यक्ष नितीन एडके यांनी दिले. या प्रसंगी उपस्थित राष्ट्रीय कोअर कमिटीचे अध्यक्ष राजू पवार, राष्ट्रीय अध्यक्ष जमीर सौदागर, महिला प्रदेशाध्यक्षा माधुरी वाणी, पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष बिरादर, अहमदनगर जिल्हाध्यक्ष संदीपशेठ रोहकले, पैठणचे तालुकाध्यक्ष रवींद्र घेर, पाथर्डी तालुका अध्यक्ष ओम शर्मा व अहमदनगर जिल्हाध्यक्ष सुशील झाडे, तिसगाव शहराध्यक्ष सोमनाथ गोरडे होते.

समितीने दिलेल्या पदाला योग्य न्याय देण्याचे काम करणार असल्याचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष किरण घोरतळे यांनी सांगितले.

## सुमित शिवानंद हरंगुळे



अंबाजोगाई शाखेचे जुने सन्माननीय सभासद खातेदार व अंबाजोगाई शहरातील प्रसिद्ध सोनेचांदीचे व्यापारी श्री. शिवानंद हरंगुळे यांचे चिरंजीव श्री. सुमित शिवानंद हरंगुळे यांची लेफ्टनंटपदी नियुक्ती झाली आहे. सुमित शिवानंद हरंगुळे यांनी प्राथमिक शिक्षण अंबाजोगाईत घेऊन पुढील शिक्षण सैनिक स्कूल सातारा येथे घेतले. त्यांची INDIAN MILITARY ACADEMY (IMA) मधून लेफ्टनंटपदी नियुक्ती झाल्याबद्दल शाखेतर्फे त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## बँकेचे नवनियुक्त पदाधिकारी

आपल्या बँकेच्या नूतन अध्यक्षपदी सनदी लेखापाल माधव (अभय) रामकृष्ण माटे आणि उपाध्यक्षपदी ॲड. अलका विजय पेटकर यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. नवीन पदाची सूत्रे त्यांनी नुकतीच स्वीकारली. माटे यांनी यापूर्वी उपाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली आहे. त्याचप्रमाणे उपाध्यक्ष पेटकर यांनी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये विविध पदांवर काम केले आहे.



सीए अभय माटे
अध्यक्ष



ॲड. अलका पेटकर
उपाध्यक्षा



## श्री. योगेश राजीव सारणीकर

अंबाजोगाई शाखेचे सन्माननीय सभासद खातेदार व बँकेच्या पॅनेलवरील व्हॅल्युअर श्री. राहुल राजीव सारणीकर यांचे बंधू श्री. योगेश राजीव सारणीकर हे MPSC राज्य सेवा परीक्षा २०१९ मधून उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांची राज्य उत्पादन शुल्क उपअधीक्षक (DYSP) पदी निवड झाल्याने त्यांचा शाखेतर्फे सत्कार करण्यात आला.

### अभिनंदन !!



बँकेच्या कोल्हापूर शाखेचे सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. निलेश माधव देशपांडे यांना आयआयबीएफ या संस्थेची असोसिएट मेंबरशीप मिळाली असून त्या बाबत त्यांचे अभिनंदन!



श्री. सौरभ पद्माकर पवार (Certified Information System Auditor (CISA) उत्तीर्ण झाल्या बद्दल त्यांचे अभिनंदन!

## साधेपणाने व उत्साहाने गणेशोत्सव साजरा





जनता बँक पुणे कर्मचारी गणेशोत्सव मंडळाने यंदा ३३ वे वर्ष साजरे केले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक रूढी-परंपरांचे पालन करीत गणेशोत्सव साधेपणाने, पण अतिशय उत्साहाने साजरा केला. मंडळातर्फे साजरे होणारे कार्यक्रम यंदा ऑनलाइन घेण्यात आले. त्यात महिलांच्या ऑनलाइन अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम झाला. यासाठी अनेक महिला सेवकांनी सहभाग घेतला. ह.भ.प. चारुदत्त आफळे यांचा 'भारताचे पहिले परमवीर चक्र विजेते सेनाधिकारी सोमनाथ शर्मा' या विषयावर कीर्तनाचा ऑनलाइन कार्यक्रम झाला. गलवान खोऱ्यात नेमके काय झाले, या विषयावर ब्रिगेडिअर हेमंत महाजन (निवृत्त) यांचे व्याख्यान झाले. पुलंची 'बटाट्याची चाळ' या विषयावर श्री. राहुल भालेराव यांचा कार्यक्रम झाला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गणपती विसर्जनसुद्धा साधेपणाने गच्चीवर हौदात करण्यात आले.

# विलेपार्ले शाखेमार्फत आयोजित ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा

आपल्या बँकेच्या विलेपार्ले शाखेमार्फत शाखेतील ग्राहक व शाखा परीसरातील ज्येष्ठ नागरिकांकरिता इच्छापत्र व विश्वस्त निधी विषयाबाबत माहिती देण्याकरिता गुरुवार, दि.१२.१२.२०१९ रोजी सायं ५.३० वाजता, श्री. जनार्दन अंनत शानभाग सभागृह, उत्कर्ष मंडळ विलेपार्ले येथे ज्येष्ठ नागरिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.




उपरोक्त कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून ॲड. प्रमोद बेंद्रे यांची उपस्थिती होती. तसेच विलेपार्ले शाखाव्यवस्थापक श्री. माधव खरे व विभागाचे अधिकारी श्री. किशोर चव्हाण यांची उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमास सुमारे ८० हून अधिक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. खरे यांनी उपस्थित मान्यवर आणि उपस्थित सर्व ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत केले. बँकेविषयी माहिती देऊन बँकेच्या एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागाद्वारे इच्छापत्राविषयी माहिती देण्यासाठी आजचा कार्यक्रम आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. श्री. प्रमोद बेंद्रे यांनी आपल्या शैलीत इच्छापत्राबाबत माहिती दिली. त्यानंतर एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागाचे अधिकारी श्री. किशोर चव्हाण यांनी इच्छापत्रास व्यवस्थापकाची आवश्यकता व त्याचे अधिकार याविषयी माहिती दिली. व्यवस्थापक म्हणून व्यक्ती नेमल्यास येणाऱ्या अडचणी व व्यवस्थापक म्हणून संस्थेची निवड केल्यास होणारा फायदा या विषयीची माहिती श्री. चव्हाण यांनी दिली.त्यानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला व खातेदारांच्या अनेक शंका अथवा समस्येवर श्री. बेंद्रे यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

काही खातेदारांनी आपले इच्छापत्र बनविण्यासाठी कार्यक्रमानंतर श्री. किशोर चव्हाण यांच्याकडे चौकशी करून बँकेस व्यवस्थापक म्हणून नेमण्याचा मानस व्यक्त केला.

## जनता बँक कोल्हापूर शाखेकडून शिक्षक दिन साजरा

जनता सहकारी बँक लि. पुणे शाखा कोल्हापूर यांचेमार्फत दरवर्षी 'शिक्षक दिन' प्रत्यक्ष शाळांना भेटी देऊन, गुलाबपुष्प व पेढे देऊन बँकेच्या वतीने शिक्षक वर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त करून साजरा केला जातो. परंतु सध्याच्या काविड १९ च्या पार्श्वभूमीवर काही शाळांमधील शिक्षकांनी गुगल मीटद्वारे प्रत्यक्ष संवाद साधला. या वेळी मोठ्या संख्येने शिक्षक ऑनलाइन उपस्थित होते.

या वेळी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षक वर्गाच्या आरोग्याची आस्थेने विचारपूस केली. तसेच शिक्षक वर्गाने प्रत्यक्ष विद्यार्थी समोर नसताना ऑनलाइन पद्धतीने गुगल मीट, व्हॉट्सॲप, यूट्यूब अशा वेगवेगळ्या माध्यमांतून आपले विद्यादानाचे काम अव्याहतपणे सुरू ठेवलेले आहे. तसेच त्यांच्यापैकी काही जण 'कोविड योद्धे' बनून सेवा बजावत आहेत; याबद्दल त्यांचे कौतुक केले. जनता बँकेने सध्या सर्व ग्राहकांना अखंडितपणे सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळून व आवश्यक ती काळजी घेऊन सेवा दिलेली आहे, याची माहिती दिली. तसेच जनता बँकेतून वेतन होणाऱ्या व न होणाऱ्या अशा विविध शाळा व महाविद्यालये यांमधील शिक्षकांना दूरध्वनी व व्हॉट्सॲपवरून शुभेच्छा संदेश, याद्वारे शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देऊन कृतज्ञता व्यक्त केली. सर्व शिक्षक वर्गाने बँकेच्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. शिक्षक दिनाचा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी जनता बँकेचे शाखाव्यवस्थापक निलेश देशपांडे, वरिष्ठ अधिकारी उदय कुलकर्णी, सर्व अधिकारी वर्ग यांनी विशेष प्रयत्न केले.

## सहकारनगर शाखेमध्ये 'मराठी राजभाषा दिन' उत्साहात साजरा



सहकारनगर शाखेमध्ये २७/०२/२०२० रोजी 'मराठी राजभाषा दिन' कार्यक्रम राबविण्यात आला. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज अर्थात वि.वा. शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. मायमराठीचा गौरव करण्याचा, आपल्या मातृभाषेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस 'मराठी राजभाषा दिना'चे औचित्य साधून सहकारनगर शाखेने उल्लेखनीय कार्यक्रम राबविला.

आपली बँक नेहमीच केवळ व्यवसाय न करता विविध कार्यक्रम राबवीत असते. मराठी राजभाषा दिनाचे निमित्तसाधून '१०१ हमेबंद मुदत ठेव खाते' जास्तीतजास्त सुरू करण्याची कल्पना सर्व सेवकांच्या मनात होती. त्यानुसार १७० हमेबंद मुदत ठेवखाती त्याच दिवशी सुरु करण्यात आली. त्याचप्रमाणे शाखेमध्ये विविध कवी, कवियित्री व लेखक यांचे फोटो लावून त्यांच्या प्रसिद्ध कविता, प्रसिद्ध वाक्ये कोडस्वरूपात लावण्यात आली.

सहकारनगर शाखेतील सेविका कु. स्वागता पंडित यांच्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाला ज्येष्ठ कवयित्री, साहित्यिक डॉ. अरुणाताई ढेरे अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे १५ वर्षे चित्रपट क्षेत्रात गीतकार म्हणून कार्यरत असलेले लेखक व कवी श्री. वलय मुळगुंद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत. संचालिका डॉ. मधुरा कसबेकर व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. काकतकर सर हे देखील उपस्थित होते. डॉ. अरुणाताई ढेरे यांच्या हस्ते वलय मुळगुंद यांचा सन्मान करण्यात आला. सहकारनगर शाखेचे शाखाव्यवस्थापक श्री. पराग ठाकूर यांच्या आभार-मनोगताने कार्यक्रम संपन्न झाला.

# जनता वेल्फेअर सोसायटी मार्फत कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध उपक्रमांचे आयोजन



जनता वेल्फेअर सोसायटीमार्फत पुणे शहरातील दोन कोविड सेंटर (विलगीकरण केंद्र) येथे आपल्या सर्व सेवकांच्या वतीने एकूण सात गरम पाण्याच्या मशीन तेथील रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सणस मैदान कोविड सेंटर येथे चार गरम पाण्याच्या मशीन पुण्याच्या मा. उपमहापौर सौ. सरस्वती शेंडगे व बँकेचे मा. संचालक श्री. बिरू खोमणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली आहेत. तसेच कोविड सेंटरमध्ये माहे मार्चपासून अहोरात्र सेवा देणारे डॉक्टर्स, नर्सेस व कर्मचारी वर्ग यांचा कृतज्ञता भेट देऊन सत्कार करण्यात आला. कृतज्ञता भेटमध्ये मिठाई पुडा, उच्च प्रतीचे दोन मास्क व सॅनिटायजर बाटली यांचा समावेश आहे. कोविड सेंटरचे प्रमुख डॉ. अमोल राठोड यांचा गौरव मा. उपमहापौर यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाची प्रतिमा देऊन करण्यात आला. सदर प्रसंगी सोसायटीचे अध्यक्ष श्री. किशोर चव्हाण, श्री. बिरू खोमणे व सौ. सरस्वती शेंडगे यांनी आपले मनोगत व्यक्त करून कोविड सेंटर मधील सेवकांप्रती ऋण व्यक्त केले. मार्केट यार्ड शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. संजय आगाशे यांनी सेंटरमध्ये मिळालेल्या उपचारांबाबत समाधान व्यक्त केले तसेच मा. उपमहापौर यांनी मार्केट यार्ड शाखेतील सेवकांची उपचाराची व्यवस्था सणस कोविड सेंटर येथे करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. सेंटरमधील अधिकारी श्री. बंडगर यांनी कोविड सेंटरमध्ये देत असलेल्या सुविधांबद्दल माहिती दिली. सोसायटी सदस्य श्री. शरद शिंदे यांनी सूत्रसंचालन केले आणि कोषाध्यक्ष श्री. सचिन आंबेकर यांनी आभार मानले.

रा. स्व.संघ जनकल्याण समिती संचालित गरवारे कोविड सेंटर येथे रूग्णांसाठी तीन गरम पाण्याच्या मशीन मा. उपमहापौर सौ. शेंडगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आल्या आहेत. सदर प्रसंगी रा.स्व.संघ महानगर कार्यकारणी सदस्य व केंद्र प्रमुख श्री. शशिकांत पडळकर व श्री. राजाभाऊ शेंगडे उपस्थित होते.

वरील उपक्रमास सोसायटी अध्यक्ष किशोर चव्हाण, कला क्रीडा अध्यक्ष अभिजीत मकाशीर, सचिव विजय फाटक, कोषाध्यक्ष सचिन आंबेकर, सदस्य शरद शिंदे, विजय धोत्रे, अविनाश निरगुडे व बँकेतील अनेक सेवक उपस्थित होते.

---

# धोपावकर परिवार विश्वस्त निधीमार्फत शुद्ध पेयजल प्रकल्प (आर.ओ.प्लँट) लोकार्पण सोहळा संपन्न




धोपावकर परिवार विश्वस्त निधी या सार्वजनिक विश्वस्त संस्थेसाठी बँक कार्यकारी विश्वस्त म्हणून काम पाहत आहे. विश्वस्त निधीच्या वतीने निधिपत्रातील उद्देशानुसार समाजातील विविध गरजू व्यक्ती-संस्था यांना आर्थिक साहाय्य केले जाते.

उपरोक्त विश्वस्त निधीद्वारा कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यात खणदाळ गावात शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रकल्प उभारण्यात आला आहे. सदर शुद्ध पेयजल प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा प्रजासत्ताक दिनानिमित्त रविवार, दिनांक २६ जानेवारी २०२० रोजी संपन्न झाला. शुद्ध पेयजल प्रकल्पाचे उद्घाटन आपल्या बँकेचे तत्कालीन मा. अध्यक्ष श्री. संजयराव लेले, विश्वस्त निधीचे मा. अध्यक्ष श्री. नागेश धोपावकर यांच्या हस्ते झाले, तर सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून बँकेचे मा. संचालक श्री. बिरुजी खोमणे उपस्थित होते. तसेच तळेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते श्री. सतीश साठे व विभागाचे अधिकारी श्री. किशोर चव्हाण उपस्थित होते. तसेच प्रकल्पाची कंत्राटदार कंपनी एस. एन. पाटील (सरकारी नोंदणीकृत ठेकेदार कोल्हापूर) यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रकल्पाची क्षमता ताशी १००० लिटर शुद्ध पाणी देण्याची आहे. ग्रामस्थांसाठी एक रुपयात १० लिटर शुद्ध पाण्याची व्यवस्था सदर प्रकल्पातून करण्यात आली आहे.

त्यानंतर खणदाळ येथील विद्या मंदिर या शाळेच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री लेलेसाहेब, श्री. खोमणेसाहेब, श्री. धोपावकर उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. इब्राहीम काजी, शाळेतील शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपाला मा. श्री संजयराव लेले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

विद्या मंदिर या शाळेतील कार्यक्रमानंतर शुद्ध पेयजल प्रकल्पाचे उदघाटन करण्यात आले. प्रकल्पातील विविध मशिनरीचे पूजन करण्यात आले. प्रकल्पाचे उद्घाटन श्री. धोपावकर व श्री. लेलेसाहेब यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. मा. सरपंच सौ. चिरमुरे, मा. उपसरपंच श्री. बाळासाहेब जाधव, ग्रामपंचायत सदस्य श्री. राजेंद्र जाधव, पंचायत समिती सदस्य श्री. इराप्पा हसुरी, गावपाटील श्री. शशिकांत पाटील, शंकरलिंग दुध व्यवसाय संस्थेचे अध्यक्ष श्री. दुरदुंडी पाटील, श्री. अमित कामथे, फौजी काकासाहेब मोकाशी व नानाजी पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# Customer Due Diligence...
# एक दृष्टिकोन असाही...



१) बँकेत खाते उघडायचे म्हटले, की फॉर्म, ओळख पटवणारी कागदपत्रे, नियम, कायदे, वेळ, पैसा आणि इच्छाशक्ती हवी. ही इच्छा निर्माण होण्यासाठी गरज, फायदा, व्याज, सेवासुविधा, सोय- मग ती व्यवहाराची असेल किंवा शहरांमध्ये पार्किंगची सुविधा, बँकेची वेळ व सेवा देण्याची / व्यवहाराची कार्यपद्धती. आर्थिक क्षेत्रातील नाव Goodwill यावर सर्वसाधारणपणे अवलंबून असते. इच्छा निर्माण करण्यासाठी विविध मार्गांचा उपयोग संस्थांकडून केला जातो. त्यात प्रामुख्याने जाहिरात, सोशल मीडिया यांची भूमिका जेवढी जास्त महत्त्वाची, तेवढीच सुप्तपणे पण जनमानसावर प्रभाव टाकून जनमत तयार करणारी 'Man to Man Publicity' ही तेवढीच महत्त्वाची, असे सर्वसाधारण व्यावसायिक स्वरूप ९०च्या दशकातले आहे असे म्हणता येईल.

९०च्या दशकात भारताने आपल्याला जागतिक अर्थव्यवस्थेबरोबर जोडून घेण्यासाठी तसेच अन्य देशांच्या आर्थिक, सामाजिक सेवा क्षेत्रातील संधी व पर्यायाने विकसनशील देश, अशी असलेली ओळख बदलण्याची संधी म्हणून Globalisation चा स्वीकार करून त्यानुसार निर्णय, व्यवस्था, कायदे, नियम, सुधारणा करण्याची सुरुवात केली. त्याचा परिणाम नजीकच्या काही वर्षांत दिसू लागला.

सर्वत्र संगणकाचा वापर, तांत्रिक सुधारणा, विविध शोध या आधारे जीवन गतिमान झाले. हीच गती माणसाला नियंत्रित करू लागली व मानव या गतीनुसार धावण्याचा प्रयत्न करू लागला, त्याचे फायदे अनेक झाले. बँकिंग क्षेत्राचा विचार करता बँकिंग क्षेत्र हे केंद्रस्थानी आले. बँकांनी आपल्या कुवतीनुसार बदल स्वीकारले-त्यांचे अग्रक्रम ठरविले. बँकांनी आपले व्यवसायाचे स्वरूप बदलून व्यवसायाचा विस्तार करून गल्लीपासून गाव-शहर, राज्य, देश यांच्या सीमा ओलांडून जागतिक स्तरावर व्यवसायवाढ केली.

बदलत्या व्यावसायिक स्वरूपानुसार नियम, कायदे व दृष्टिकोन यांतही बदल होणे स्वाभाविक होते. ज्यांनी आपला दृष्टिकोन बदलला, त्याच संस्था टिकून आहेत. बँकिंग व्यवस्थेत झालेल्या बदलांमध्ये केवळ राष्ट्रीयीकृत बँकेवर अवलंबून न राहता खाजगी, सहकारी, पेमेंट बँका, स्मॉल सेव्हिंग्ज बँक, अगदी पोस्ट खातेही बँकिंग करू लागले. तंत्रज्ञानावर आधारित असंख्य सुविधांचा महापूर आला. त्यांना सामावून घेणेसाठी संस्था तसेच मोठ्या प्रमाणावर ग्राहकवर्ग तयार झाला व तो सतत वाढतच आहे.

सहकारी बँकांनीही वेळोवेळी सहकार खाते व रिझर्व्ह बँक यांचे दुहेरी नियंत्रण व होणारे व्यावसायिक स्पर्धायुक्त बदल आपल्या कुवतीनुसार स्वीकारले व आपल्या कार्यपद्धतीमध्ये बदल केला. तंत्रज्ञानाचा अंगिकार केला. सर्व बँकांशी असणाऱ्या व्यावसायिक स्पर्धेच्या गतिमान चक्रीवादळात आपल्या सभासद, ग्राहक, सेवक व खातेदार यांच्या सहकार्याने आपले स्थान बळकट करून सातत्याने व्यवसायवृद्धी केली. त्याचे शक्तिस्थळ म्हणजे कालानुरूप बदल स्विकारण्याचा दृष्टीकोन!

सहकारी बँकांनी आपल्या सभासद खातेदारांसाठी काम करताना व्यवसायाबरोबरच खातेदारांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, जबाबदारी व कर्तव्ये यांबाबत जागृती, याबरोबरच सस्मित, सस्नेह, पारदर्शी, अद्ययावत सेवेच्या बळावरच एक अलिखित कोणताही नियम-कायदा यांचे बंधन नसलेले जिव्हाळ्याचे कौटुंबिक नाते निर्माण करून त्यांच्या आर्थिक अडचणींबरोबरच आनंद, दु:ख, सद्भावना, मैत्री यांसारख्या मानवी भावनांचीही जोपासना केली. ती जोपासना केवळ सभासद, खातेदार यांचेशी सतत विविध मार्गांनी ठेवलेला संपर्क, त्यांची अद्ययावत माहिती व त्या माहितीच्या आधारे विविध व्यावसायिक योजना तयार करून त्या आधारे हे संबंध अधिक दृढ केले. सहकारी बँकांनी अंगिकारलेल्या कार्यपद्धतीचे कायदा व नियम यांमधून प्रकट होणारे स्वरूप म्हणजे 'Customer Due Diligence', असे म्हणता येईल.

२) बँकांनी खाते उघडताना विविध कागदपत्रे घेतली असूनसुद्धा बँका स्थळ, वेळ, काळ, वय, व्यवसाय, निवास व व्यवहाराच्या सोयीसाठी झालेल्या बदलांमुळे बँकेच्या व्यवसायावर होणारे परिणाम गृहीत धरून ग्राहकांच्या अद्ययावत नोंदी ठेवण्यासाठी ग्राहकांकडे ठराविक कालावधीनंतर पुन:पुन्हा काही कागदपत्रांची मागणी करतात त्यालाच रेग्युलेटरच्या/रिझर्व्ह बँकेच्या भूमिकेतून 'Customer Due Diligence' असे म्हणतात.

यामध्ये खातेदारांच्या व्यवहार, उत्पन्नाचा स्रोत, व्यवसाय, स्वरूप, नोकरीतील उत्पन्न या आधारावर त्यांचे खाते व्यवहारामुळे भविष्यात बँकेस येणारी व्यवसाय जोखीम यांचा साकल्याने विचार करून रिझर्व्ह बँकेने बँकांना मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे Low Risk, Medium Risk, High Risk या प्रकारे Customer risk categorisation चे निकष ठरवून दिले आहेत व त्यांचे पालन बँकांनी करावे, यासाठी नियंत्रण ठेवणेसाठी तपासणीची कार्यपद्धती ठरवून दिलेली आहे. या बाबत कॅटेगरीनिहाय माहिती पुढे नमूद केली आहे.

Low Risk - ज्या खातेदाराचे उत्पन्न निश्चित व्यवहार नियंत्रित किंवा ठराविक प्रकारचे उदा. पगार जमा होणे, दरमहा पेन्शन, घरभाडे इ. अशा रकमा जमा होणे तसेच दैनंदिन खर्च किंवा ठराविक रकमेचे व नियंत्रित स्वरूपाचे वैयक्तिक व्यवहार, अशा खातेदाराची खाती या Category मध्ये समाविष्ट आहेत. अशा खातेदारांच्या व्यवहाराची जोखीम बँकेसाठी कमी असल्याने १० वर्षांतून किमान एकदा माहिती अद्ययावत करणे सक्तीचे आहे.

Medium Risk - यामध्ये सर्व व्यावसायिक खातेदार, संस्था यांच्या खात्यांचा समावेश होतो. अशा खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर व मोठ्या रकमेचे व्यवहार होत असल्याने अशा खातेदारांच्या व्यवहाराची जोखीम बँकेसाठी काही प्रमाणात असल्याने ८ वर्षांतून किमान एकदा माहिती अद्ययावत करणे सक्तीचे आहे.

High Risk - यामध्ये सर्व व्यावसायिक खातेदार, संस्था यांच्या खात्यांचा समावेश होतो, तसेच काही विशिष्ठ व्यवसाय- उदा. Gold, precious metal, Political Person, Builder अशा काही श्रेणींतील खातेदारांचा समावेश आहे. अशा खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मोठ्या रकमेचे व्यवहार होत असल्याने अशा खातेदारांच्या व्यवहाराची जोखीम बँकेसाठी जास्त असल्याने २ वर्षांतून किमान एकदा माहिती अद्ययावत करणे सक्तीचे

**उर्वरित पुढील पानावर**

# ग्लोबल होत असलेल्या पुण्याचा एक नवाशोध 'explorepune.in'

***आपल्या सिंहगड रोड शाखेचे खातेदार मे. एज क्रिएटेक प्रा. लि. यांनी पुणे महानगपालिकेच्या ब्रॅण्डिंगसाठी डेव्हलप केलेल्या वेबसाईटचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले. या विषयीची ही माहिती***

जगाच्या नकाशावर झळकत असलेल्या आणि दिमाखदार परंपरा जपत आधुनिकतेकडे वाटचाल करीत बदलत असलेल्या पुण्याची ओळख एक ब्रॅन्ड म्हणून तयार करतानाच ते जगामध्ये एक टुरिस्ट डेस्टिनेशन म्हणून पुढे यावे, यासाठी 'एक्सप्लोअर पुणे' हे संकेतस्थळ तयार झाले आहे. त्याचा सोशल मीडियाद्वारे प्रसार करण्यात येणार असून एकाच वेळी पुणे शहर हे जगभरामध्ये जोडले जाण्याचा हा एक अनोखा प्रयत्न आहे.

ऐतिहासिक शहर, विद्येचे माहेरघर, माहिती-तंत्रज्ञानाचे शहर, ऑटो हब, वारसास्थळे असणारे शहर, अशी पुण्याची बहुविध ओळख आहे. या पुण्याला जगामध्ये एक ब्रॅन्ड म्हणून साकारण्यासाठी पुणे महानगरपालिका व एज क्रीएटेक प्रा. लि.यांनी explorepune.in हे संकेतस्थळ तयार केले आहे.

पुण्यामध्ये येणाऱ्या पर्यटकांचा विचार करून या संकेतस्थळावर सर्व माहिती एकत्रित देण्यात येणार आहे. पुण्यातील वारसास्थळे, ऐतिहासिक इमारती, खाद्यसंस्कृती, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, नाट्यसंपदा, उद्योग व्यवसाय, पुण्यातील कला, सोयीसुविधा, आधुनिक पुणे, पुण्यातील सगळे सांस्कृतिक महोत्सव आदी विविध प्रकारची माहिती या संकेतस्थळावर असेल. पुण्यात एखाद्या ठिकाणी कसे जायचे, कुठे राहता येईल, काय पाहता येईल; अशा उपयुक्त गोष्टीही या संकेतस्थळावर असतील. त्याचा जगभरातील पर्यटकांनाच नव्हे, तर देश आणि राज्यातील पर्यटकांनाही मोठा उपयोग होईल आणि पुण्याकडे पर्यटकांचा ओघ वाढेल.

नजीकच्या काळात 'explorepune' याच नावाने मोबाइल ॲप्लिकेशन तयार करण्यात येणार असून संकेतस्थळावर असणारी सगळी माहिती त्यामध्ये उपलब्ध होईल. तसेच नकाशे, विविध ठिकाणांचे बुकिंग, शहरात होणारे कार्यक्रम, अशा सुविधाही या ॲप्लिकेशनवर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. याशिवाय या संकेतस्थळावरील माहिती आणि ॲप्लिकेशनची माहिती सोशल मीडियाद्वारे देण्यात येणार असून त्यामुळे जगभरातील पर्यटकांचा ओढा पुण्याकडे वाढेल.

पक्का पुणेकर माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी त्याचे पुण्याबद्दलचे प्रेम कधीच कमी होत नाही. त्यांच्या पुण्याबद्दलच्या आठवणी, अनुभव तसेच आपण मिळवलेले अतुलनीय यश ग्लोबल पुणेकर या सदरात असेल, अन् परदेशांतून पुण्यात येऊन स्थायिक झालेलेही पुण्याबद्दलची त्यांची आत्मीयता येथे शब्दांत व्यक्त करणार आहेत.

या संकेतस्थळावर अस्सल पुणेरी या कॉलममध्ये पुणेकराला त्याचा पुण्याबद्दलचा एक जाज्वल्य अभिमान दिसेल. त्याला नावीन्याचा ध्यास असतो. पेठा, आळ्या, गल्ल्या, शाळा, महाविद्यालये, ऑफिसेस, वैशिष्ट्यपूर्ण खाण्याचे अड्डे यांबरोबरच पुणेरी पाट्या, पुणेरी नमुने, पुणेरी स्वभाव यांबद्दलही या संकेतस्थळावर सगळे काही असेल अन् थेट अस्सल पुणेरी भाषेत.

कला-संस्कृतीचे माहेरघर असलेले हे पुणे आता विस्तारत आहे. आयटी, ऑटोमोबाइलपासून अनेक क्षेत्रांत पुण्याने उल्लेखनीय भरारी मारली आहे. त्यामुळेच कुठलाही पुणेकर कॅलिफोर्नियाच्या स्ट्रीटवर सहजपणे भटकताना दिसतो. म्हणूनच पुणे हे ग्लोबल व्हावे, यासाठी एक्सप्लोअर पुणे हे दिमाखदार संकेतस्थळ आता आपल्या समोर येत आहे.

सदर संकेतस्थळाचा लोकार्पण सोहळा दि. १७ ऑगस्ट २०२० रोजी मा. मुरलीधर मोहोळ, महापौर यांच्या शुभ हस्ते व मा. सौ. सरस्वती शेंडगे, उपमहापौर, मा. हेमंत रासने, अध्यक्ष स्थायी समिती, मा. धीरज घाटे, सभागृह नेते, मा. पृथ्वीराज सुतार, पक्षनेते, शिवसेना, मा. विक्रम कुमार, महापालिका आयुक्त, मा. शेखर गायकवाड, साखर आयुक्त, मा. योगेश रिसवाडकर, डायरेक्टर, एज क्रीएटेक प्रा. लि., मा. राहुल गोडसे, डायरेक्टर, एज क्रीएटेक प्रा. लि., मा. राहुल सोलापूरकर, एज क्रीएटेक प्रा. लि. तथा सिने अभिनेते व पुणे महानगर पालिकेतील मा. अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

***

**मागील पानावरून**

## Customer Due....

आहे.

KYC (Know Your Customer) norms सर्वच व्यवहारांना बंधनकारक आहेत. उदा. Mobile, phone connection, Car, Two Wheeler अशा कोणत्याही गोष्टींची खरेदी करताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय व्यवहार पूर्ण होत नाही; त्यामुळे त्या पूर्ण केल्या जातात. परंतु बँक आपलीच आहे, पूर्वी माहिती दिलेली आहे, एवढी काय घाई आहे, आणून देतो, अशा अनेक सबबींमुळे दिरंगाई होऊन शेवटी नियम-कायदा म्हणून बँकेस कार्यवाही करावी लागते व बँक व खातेदार यांच्यातील वैयक्तिक जिव्हाळ्याच्या नात्यात कटुता येऊ शकते. त्यामुळे ग्राहकांनी आपणहून पुढाकार घेऊन आपल्या स्वत:चे वय, व्यवसाय, नोकरी, निवृत्ती, जन्म, मृत्यु, कौटुंबिक, निवासाचा पत्ता, बदललेल्या नोकरीचे ठिकाणचा पत्ता, अशा कोणत्याही प्रकारे बदल झाल्यास आपली माहिती बँकेस आवश्यक कागदपत्रांसह देऊन अवगत करणे, माहिती अद्ययावत करणे दोघांच्याही हिताचे आहे.

३) Customer Due Diligence, Know Your Customer याकडे कायदा/नियम/ म्हणून जाचकपणे न पाहता आपण, आपल्यासाठी, आपल्या बँकेला अद्ययावत माहिती ठराविक कालावधीनंतर देऊन रोचक अनुभव द्यावा असे वाटते. या विषयावर आपल्याशी संवाद साधताना प्रस्तावना विस्तृत करताना या विषयाकडे बघण्याचा बँक, बँकेचे सेवक व खातेदार यांचा Common approach तयार करणे हा एकमेव उद्देश आहे.

खातेदारांनी मी, माझी, माझ्या कुटुंबाची, संस्थेची अद्ययावत माहिती माझ्या बँकेला वेळचे वेळी देऊन अद्ययावत ठेवीन तसेच त्या माहितीच्या आधारे बँकेकडून वेळोवेळी जाहीर होणाऱ्या नवनवीन योजनांचा लाभ घेईन. सातत्याने संपर्काच्या आधारे माझ्या आवश्यकतांची माहिती देऊन बँकेला विविध योजना तयार करणेसाठी मदत करेन, असा दृष्टिकोन ठेवला तर खातेदार व बँक यांचे नाते अधिक बळकट होऊन ते पिढीजात वृद्धिंगत होईल असे वाटते.

सभासद, खातेदार, बँक व सेवक यांनी एकमेकांशी पारदर्शक व निर्मळ व्यावसायिक व्यवहारांची साखळी विणल्यास बँका, त्यांचे सेवक, सभासद व खातेदार यांचे एक सक्षम, सुरक्षित, जिव्हाळ्याचे कौटुंबिक नाते दृढ होईल.

**विजय वसंत जोशी**
AML CELL audit
Department

***

# कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सायबर अ‍ॅटॅकचा धोका

मार्च २०२० पासून जगभरात संसर्गजन्य कोरोना विषाणूने (कोविड-१९) थैमान घातले आहे. सर्व देश ह्या विषाणूपासून वाचण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. तर ह्या पार्श्वभूमीचा फायदा घेऊन सायबर क्रिमिनल्स विविध पद्धतींचा अवलंब करून व्यक्ती व संस्थांवर हल्ला करून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेण्यात कार्यरत आहेत. झेड डीनेटच्या वृत्तानुसार उत्तर कोरियाच्या लाजरस ह्या हॅकर्स ग्रुपकडून कोविड-१९ थीम असलेला फिशिंग अ‍ॅटॅक होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. छोट्या-मोठ्या उद्योगांसह ५० लाखांहून अधिक व्यक्ती आणि व्यवसायांना लक्ष्य करीत मोठ्या प्रमाणात फिशिंग अ‍ॅटॅक करण्याच्या मोहिमेचा हा एक भाग आहे. हा फिशिंग अ‍ॅटॅक करण्यासाठी लक्ष्य करण्यात आलेल्या देशांमध्ये भारतासह सिंगापूर, दक्षिण कोरिया, जपान आणि अमेरिका यांचाही समावेश असल्याचे झेड डीनेट ह्यांनी नमूद केले आहे.

मायक्रोसॉफ्टच्या कार्यकारिणीनुसार, हॅकर्स लोकांवर खंडणी व फिशिंग हल्ले करण्यासाठी




लेखक - आशिष नवरे

कोविड-१९ चा वापर करत आहेत आणि २ फेब्रुवारी ते २ मे दरम्यान भारतात ९००० पेक्षा जास्त कोरोना व्हायरस थीम असलेले हल्ले झाल्याचे लक्षात आले आहेत.

कोविड-१९ थीमचा वापर करून करण्यात येत असलेल्या हल्ल्यांच्या कार्यपद्धतीचे काही प्रकार पुढीलप्रमाणे :- १. सायबर गुन्हेगार कोविड-१९ संदर्भातील महत्त्वपूर्ण माहिती अपडेटच्या स्वरूपात किंवा उपचारासंदर्भात खरी असल्याचे भासवून फिशिंग ईमेल पाठवतात. २. भारतीयांना लक्ष्य करण्यासाठी पीएम केअर नावाने बऱ्याच प्रमाणात बनावट वेबसाइट्स तयार करण्यात आल्या आहेत. ३. सायबर हल्ला करण्यासाठी फिशिंग फॉर्म्स, स्पीयर फिशिंग, रॅनसमवेअर, मालवेअर अशा सर्व पर्यायांचा वापर करण्यात येत आहे. ४. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर इमोटेट मालवेअरचा वापर करून बँकिंग अ‍ॅपद्वारे बँक खात्याची माहिती मिळविणे.

**अशा परिस्थितीत आपण काय काळजी घ्यावी?**

✻ बँकेने उपलब्ध करून दिलेले बँकिंग अ‍ॅप्लिकेशन खात्रीशीर साइटवरूनच डाउनलोड करावे. ✻ बँकिंग अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करण्यापूर्वी त्याच्या वैधतेबाबत खात्री करून घ्यावी. ✻ पासवर्ड तयार करताना स्वत:ला आठवेल, परंतु अन्य कोणांस सहज ओळखता येणार नाही असा शब्द, अंक व संकेतचिन्ह ह्यांचा वापर करावा. ✻ पासवर्डमध्ये स्वत:चा, घरातील व्यक्ती, गाडीचा क्रमांक, जन्म दिनांक ह्यांचा वापर टाळावा. ✻ संगणक प्रणालीवरील ऑपरेटिंग सिस्टिमचे पॅचेस वेळोवेळी अद्ययावत करावेत. ✻ संगणकावर अँटीव्हायरस सॉफ्टवेअर इन्स्टॉल करावे व दैनंदिन उपलब्ध होणारे पॅचेस अद्ययावत करून घ्यावेत. ✻ वेळोवेळी संगणकाचे व्हायरस स्कॅनिंग करून घ्यावे, तसेच पेन ड्राइव्ह, ई-मेल ऑटो स्कॅन करण्याचा विकल्प चालू असावा. ✻ अनोळखी व्यक्ती / संस्थेकडून आलेल्या ई-मेलमध्ये देण्यात आलेल्या लिंकवर क्लिक करू नये तसेच अशा ई-मेलला जोडलेली कोणतीही फाईल डाउनलोड करू नये तसेच इन्स्टॉल करू नये. ✻ आपला संगणक ज्या वायफायद्वारे इंटरनेटला जोडला आहे, ती वायफाय सुविधा सुरक्षित असल्याची खात्री करा. ✻ अज्ञात व्यक्ती किंवा संस्थेकडून प्राप्त झालेल्या कोविड-१९ संदर्भातील माहिती मिळविण्यासाठी देण्यात आलेल्या लिंकवर क्लिक करू नका.

Ref : https://www.news18.com/news/tech/india-could-soon-face-massive-cyberattack-in-the-form-of-covid-19-phishing-emails-2678331.html

https://economictimes.indiatimes.com/tech/internet/9100-coronavirus-themed-cyberattacks-witnessed-in-india-between-feb-2-may-2-microsoft/articleshow/75698491.cms

## मास्क वापरासंबंधी जनजागृती



धनकवडी शाखेतील सेवक कु. ओंकार चिंतामणी भागडे याने पोलीस कमिशनर, पुणे यांच्यासाठी कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर जनजागृतीसाठी डायरेक्टर श्री. निपुण धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली एक व्हिडिओ तयार केला आहे. सदर व्हिडिओमध्ये सेवक ओंकार भागडे यांनी प्रसिद्ध अभिनेत्री रिंकू राजगुरूसोबत सहकलाकार म्हणून काम केले आहे. सदर व्हिडिओमध्ये कोविड-१९ च्या धर्तीवर समाजात मास्कच्या वापरासंबंधी जनजागृती केली आहे व कोविड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी नियमित मास्क वापरण्यासंदर्भात लोकांना आवाहन केले आहे. हा व्हिडिओ पोलीस कमिशनर, पुणे यांच्यामार्फत Twitter वर प्रसारित झाला असून T.V., Facebook, Whatsapp यांसारख्या अनेक प्रसारमाध्यमांतून लोकांपर्यंत पोहोचत आहे. व्हिडिओ लेखन व दिग्दर्शन श्री. निपुण धर्माधिकारी याने, तर एडिटिंगचे काम श्री. प्रशांत वैशंपायन यांनी केले आहे.

## भावपूर्ण श्रद्धांजली

श्री. श्रीकांत महादेव स्वामी यांचे
दि. १५/०७/२०२० रोजी दु:खद निधन झाले.

## वाचकांना नम्र आवाहन :

शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग इ. विषयी असणारी उपयुक्त बातमी, विशेष उपलब्धी, माहिती, गौरव, पुरस्कार किंवा लेख संबंधित छायाचित्रांसह जरूर पाठवावेत. यासाठीचा मजकूर A4 साइजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहून बंद पाकिटातून पुढील पत्त्यावर पाठवावा. यामधील वेचक वेधक मजकूर गरुड झेप मध्ये प्रकाशित केला जाईल. **पत्ता : श्री. नितीन कुलकर्णी, वरीष्ठ अधिकारी, पुणे. मो. क्र. : ९६५३१ ७०६७१ गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. ✻ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क साधावा.
**दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९६५३१ ७०६७१**

Ekvira23102020